महाराष्ट्र शासन सामान्य रुग्णालय, गडचिरोली		
दुरध्वनी क्रमांक (०७१३२) २२२३२०	टेलिफॅक्स क्रमांक (०७१३२) २२२६४४	जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय, चंद्रपूर रोड, मेडाकल कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५ यांचे कार्यालय. ई-मेल आय.डी. : csghgadchiroli33@gmail.com
आरोग्य सेवा	जा.क्र.सारुगड/औ.भा./Sanitary Napkin Project /दरपत्रक पुरविणे/ 8281 /२६ दिनांक : 3 NOV 2026	

प्रति,

.....

.....

विषय : गडचिरोली जिल्हयातील महिला व किशोरवयीन मुलींकरिता "मागेल तिला मोफत सॅनिटरी पॅड" योजना प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यासाठी सॅनिटरी पॅडचा संदर्भ दर व सर्वसमावेशक सेवा शुल्काबाबत ऑनलाईन दरपत्रक मागविणेबाबत सादर करण्याबाबत...

संदर्भ : मंजुर कार्यालयीन टिपणी नुसार]

महोदय,

उपरोक्त विषायान्वये संपुर्ण गडचिरोली जिल्हयातील महिला व कीशोरवयीन मुलींना मासीक पाळीच्या काळात आरोग्याच्या दृष्टीने "मागेल त्याला निःशुल्क सॅनिटरी पॅड वाटप योजना" राबवायचे आहे सदर योजनेमध्ये सॅनिटरी पॅडची मागणीनुसार उपलब्धता, OTP आधारित वितरण, वितरणाची देखरेख, सॅनिटरी पॅडचा लाभार्थ्यांच्या घरापर्यंत पुरवठा, सॉप्टवेअर प्रणाली, वितरण व्यवस्था, कर व इतर अनुपंगिक बाबींचा समावेश असुन पुर्णतःसज्ज (Turn-key) तत्वावर कार्यान्वित करावयाची आहे.

उपरोक्त विषयास अनुसरुन सविनय सादर करण्यात येते की, गडचिरोली जिल्हा हा भौगोलिकद्रुष्टया विस्तीर्ण असून जिल्हयात मोठया प्रमाणात ग्रामीण, दुर्गम व आदिवासीबहुल क्षेत्र आहे. सदर भागातील महिला व किशोरवयीन मुलींना मासिक पाळीच्या कालावधीत आवश्यक स्वच्छता साधनांची नियमित उपलब्धता सुनिश्चित करण्याच्या द्रुष्टीने "मागेल तिला मोफत सॅनिटरी पॅड योजना" प्रायोगिक तत्त्वावर राबविण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

सांख्यिकी अहवालानुसार गडचिरोली जिल्हयात अंदाजे ३,२७,७३२ लाभार्थी अपेक्षित असून, प्रत्येक लाभार्थ्यास दरमहा ०१ पॅकेट या प्रमाणे, एका पॅकेटमध्ये ०८ सॅनिटरी पॅड याप्रमाणे १२ महिन्यांसाठी एकूण १२ पॅकेट उपलब्ध करुन देणे प्रस्तावित आहे.

सदर योजना ही केवळ सॅनिटरी पॅडच्या पुरवठयापुरती मर्यादित नसून, त्यामध्ये "सॅनिटरी पॅडचा पुरवठा, साठवणूक, वाहतूक, लाभार्थी नोंदणी, OTP आधारित प्रमाणीकरण व वितरण, घरपोच वितरण व्यवस्था, सॉफटवेअर प्रणाली, ऑनलाइन डॅशबोर्ड, स्टॉक व्यवस्थापन, संस्थानिहाय / तालुकानिहाय वितरणाची माहिती, प्रलंबित मागणीचे निरीक्षण, अहवाल निर्मिती, तक्रार निवारण, पर्यावरणपूरक विल्हेवाटीसाठी मार्गदर्शन / व्यवस्था तसेच लागू कर व इतर अनुपंगिक खर्च" यांचा समावेश राहणार आहे.

त्यामुळे सदर योजनेच्या प्रस्तावासाठी बाजारपेठेतील "संदर्भ दर" निश्चित करण्याच्या द्रुष्टीने आपल्या संस्थेकडून खालीलप्रमाणे दरपत्रक मागविण्यात येत आहे.

दरपत्रकामध्ये खालील बाबींचा स्पष्टपणे समावेश करावा : -

१. सॅनिटरी पॅडचे दर प्रति पॅडनुसार द्यावा.
२. सॅनिटरी पॅडचा ब्रॅड / उत्पादकाचे नाव, आकार, गुणवत्ता व संबंधित मानके / प्रमाणपत्रे नमूद करावीत.
३. आवश्यक प्रमाणात सॅनिटरी पॅडचा पुरवठा व साठवणूक करण्याचा दर.
४. जिल्हयातील विविध तालुके / ग्रामीण व दुर्गम भागात वाहतूक व वितरणाचा दर
५. लाभार्थी नोंदणी व OTP आधारित प्रमाणीकरण प्रणाली विकसित / उपलब्ध करुन देण्याचा खर्च.
६. लाभार्थी मागणी, वितरण, स्टॉक, तालुकानिहायध्संस्थानिहाय माहिती व प्रलंबित मागणी यासाठी सॉफटवेअर व ऑनलाइन डॅशबोर्ड उपलब्ध करुन देण्याचा खर्च.
७. लाभार्थ्यांना त्यांच्या मागणीनुसार घरपोच वितरणाचा दर

८. वितरणाची ऑनलाइन नोंद, ट्रॅकिंग, अहवाल निर्मिती व डॅशबोर्ड व्यवस्थापनाचा खर्च
९. लाभार्थी तक्रारी स्वीकारणे, नोंदणी करणे व तक्रार निवारण यंत्रणेचा खर्च
१०. वापरलेल्या सॅनिटरी पॅडच्या पर्यावरणपूरक व नियमानुसार विल्हेवाटीसाठी आवश्यक व्यवस्था / मार्गदर्शनाचा खर्च
११. सदर सेवेसाठी आवश्यक मनुष्यबळ, लॉजिस्टिक्स, तांत्रिक सेवा व इतर अनुपंगिक खर्च.
१२. लागू GST व इतर सर्व करांसह अंतिम दर स्वतंत्रपणे नमूद करावेत.

दरपत्रक सादर करण्याच्या अटी :-

१. सदर दरपत्रक हे केवळ संदर्भ दर / अंदाजित बाजारभाव निश्चित करण्याच्या उद्देशाने मागविण्यात येत असून, यामुळे कोणत्याही प्रकारचा पुरवठा आदेश अथवा कामाचा अधिकार निर्माण होणार नाही.
२. दरपत्रकामध्ये नमूद केलेले दर हे सर्व कर, वाहतूक, पॅकिग, लोडिग-अनलोडिग, साठवणूक, वितरण व इतर अनुपंगिक खर्चांसह असावेत.
३. सॅनिटरी पॅडची गुणवत्ता शासनमान्य / लागू असलेल्या संबंधित गुणवत्ता मानकांनुसार असणे आवश्यक राहील.
४. गडचिरोली जिल्ह्याचा भौगोलिक विस्तार, दुर्गम व अतिदुर्गम क्षेत्र विचारात घेऊन जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये तसेच लाभार्थ्यांच्या घरापर्यंत वितरण करण्याची क्षमता पुरवठादाराकडे असणे अपेक्षित आहे.
५. OTP आधारित वितरण प्रणालीसाठी आवश्यक तांत्रिक पायाभूत सुविधा, सर्व्हर, सॉफटवेअर, डेटा व्यवस्थापन व डॅशबोर्डची सुविधा पुरविण्याची क्षमता असल्याचे स्वतंत्रपणे नमूद करावे.
६. दरपत्रकासोबत संस्थेचे "GST प्रमाणपत्र, चछ, उत्पादनध्पुरवठा परवाना / नोंदणी, संबंधित गुणवत्ता प्रमाणपत्रे व संस्थेचा संपर्क तपशील उपलब्ध करुन द्यावा.
७. प्राप्त होणारे दर हे सदर योजनेच्या प्रशासकीय/ आर्थिक प्रस्तावासाठी बाजारातील संदर्भ दर म्हणून विचारात घेण्यात येतील.

त्यामुळे आपल्या संस्थेने वरील बाबींचा विचार करुन **सॅनिटरी पॅडचा दर** तसेच **पुरवठा + साठवणूक + वाहतूक + OTP आधारित वितरण प्रणाली + सॉप्टवेअर + लाभार्थी नोंदणी + घरपोच वितरण + वितरणाचे निरीक्षण / डॅशबोर्ड + अहवालर्निमिती + तक्रार निवारण + पर्यावरणपूरक विल्हेवाटीसाठी व्यवस्था + लागू कर व इतर अनुषंगिक खर्च सहीत** अंतिम अंदाजित दरपत्रक सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये दरनिश्चिती करण्याकरीता तांत्रिक विर्निदेश तसेच अटी व शर्तीनुसार मागविण्यात येत आहेत.

सदर दरपत्रके खाली दिलेल्या नमुन्यामध्ये सिलबंद लिफाफयात दिनांक १४.११.२०२६ रोजीपर्यंत पोहचतील अशा रितीने पाठवावीत.

जिल्हा शल्यचिकीत्सक
सामान्य रुग्णालय,गडचिरोली

अटी व शर्ती :-

१) दरपत्रकाच्या लिफाफयावर Quatation for Supply OTP Based Distribution & Monitoring of Sanitary Napkin Packs will Be Delivered Directly to the Benifishieres at the their DoorStep on Turn-key Project असा स्पष्ट उल्लेख असावा.
२) दरपत्रके पुरवठादाराच्या लेटर हेडवरच स्वाक्षरी शिक्यासह सादर करावी.
३) दर नमुद करताना सर्व करसह स्पष्टपणे दाखवावी. या व्यतीरीक्त इतर कोणतेही खर्च अदा केले जाणार नाही.
४) दरपत्रकावर जीएसटी क्रमांक व पॅन क्रमांक याचा उल्लेख असावा.
५) दरपत्रकासोबत पॅनकार्ड व जीएसटी नोंदणी प्रमाणपत्राच्या स्वसाक्षांकित छायांकित प्रति Self Attested सादर केल्या असतील तरच दरपत्रक वैध मानले जाईल.
६) ईमेल द्वारे सादर केलेले दरपत्रकांचा स्वीकार केला जाणार नाही.
७) पुरवठादार संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल.
८) पुरवठादाराने मागील ३ वर्षाचे आयकर भरणा केल्याचे प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहिल.
९) दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे तसेच सदर खरेदी प्रक्रिया पुर्णपणे रद्द करण्याचे अधिकार मा.जिल्हा समिती अध्यक्ष, गडचिरोली यांनी राखुन ठेवले आहेत.
१०) दर सादर करण्यात येणाऱ्या वापरण्याची मुदत (Expiray Date) जास्त कालावधीची असावी.

GOVERNMENT OF MAHARASHTRA

CIVIL SURGEON, GENERAL HOSPITAL GADCHIROLI

Medical Complex, Gadchiroli - 442605
E-mail – csghgadchiroli33@gmail.com

Phone : 07132-222320
Fax : 0712-222644

Quotation for
Supply OTP Based Distribution & Monitoring of Sanitary Napkin Packs will Be Delivered Directly to the Benifishieres at the their Door Step on Turn-key Project
Year 2026-27

सॅनिटरी नॅपकिन पॅकचे वितरण आणि देखरेख (OTP आधारित प्रणालीद्वारे) टर्न-की (Turn-key) प्रकल्पांतर्गत, लाभार्थ्यांना घरपोच वितरण करण्याबाबतचे दरपत्रक वर्ष २०२६-२७

Quotation No. CSGH/Base rate/Sanitary Napkin/ 8281 **/26/ Dt.** 3/11/2026

Date of Release Quotation Documents : 04/11/2026
Last date of submission of (Envelope No.1) : 14/11/2026

ANNEXURE I

FORMAT FOR QUOTATION

(TO BE TYPE ON SUPPLIER LETTER HEAD)

Date :

To,
The Civil Surgeon,
Civil Hospital ,Gadchiroli

Subject: Submission of Quotation for Base Rate of Supply OTP Based Distribution & Monitoring of Sanitary Napkin Packs will Be Delivered Directly to the Benifishieres at the their DoorStep on Turn-key Project for Year 2026-27

Ref : Web site quotation Notice No. CSGH/Base rate/Sanitary Napkin Project/ /26
Date :

With Referance Above subject, We are have submitting following Items Rate with Technical Specification for Base Rate Process

Sr. No.	Name of Supply OTP Based Distribution & Monitoring of Sanitary Napkin Packs will Be Delivered Directly to the Benifishieres at the their Doorstep on Turn-key Project	Unit	Rate with Taxes
1	Operationl Cost of Software, Transportation HR, Distribution & Monitoring and Others	Each	
2	Sanitary Napkin Pad	Each	

Your Faithfully

Supplier Stamp & Sign

परिशिष्ट अ

Sr. No.	Name of Supply OTP Based Distribution & Monitoring of Sanitary Napkin Packs will Be Delivered Directly to the Benifishieres at the their Doorstep on Turn-key Project	Unit	Rate with Taxes
1	Operationl Cost of Software, Transportation HR, Distribution & Monitoring and Others	Each	
2	Sanitary Napkin Pad	Each	

R.N. Gawand

जिल्हा शल्यचिकीत्सक
सामान्य रुग्णालय,गडचिरोली

WEB SITE DOCUMENT UPLOAD FORM (WDU)	
Name of Program	Hospital Service
Name of Designation of Officer	Civil Surgeon, District Hospital Gadchiroli
Date of Publication	4-11-2026
Display on Website (v) Checkbox	www.arogya.maharashtra.gov.in
Publish on section/tab of website	Publication section / Quotation Section or E-Tender Section
Document Title should be displayed as (in Marathi)	Quotation for Supply OTP Based Distribution & Monitoring of Sanitary Napkin Packs will Be Delivered Directly to the Benifishieres at the their Door Step on Turn-key Project Year 2026-27 (संपूर्ण गडचिरोली जिल्हा)
Document Title should be displayed as (in English)	Quotation for Supply OTP Based Distribution & Monitoring of Sanitary Napkin Packs will Be Delivered Directly to the Benifishieres at the their Door Step on Turn-key Project for District Gadchiroli
Document Size (Document should be in PDF format and size will not exceed more than 20 MB)	Yes

Declaration

I hereby declare that all information provided in this website document upload from (WDU) for the purpose of uploading/updating document on website only and correct to the best of my knowledge. All Documents responsibility will be on concern program department only, IT NHM department is not responsible for any breach cause to content of uploaded documents. IT NHM department is responsible only for uploading/updating document on websites.

Civil Surgeon
District Hospital Gadchiroli

Place : Gadchiroli
Date : 3-11-2026